Page : 9
Date : / /

# बदल

आजोबांच्या वाड्याला होतं दगडी जोतं
आन् ओटीवर मोठ्ठं थोरलं जातं
ओव्या गात आजी जात्यावर दळायची
हातावरली आजीची भाकरी पुरीगत फुगायची
धावडी तव्यात झणझणीत झुणका
जोडीला असायचा माडग्याचा भुरका
आजोबांच्या ताटाभोवती नातवंडांचा मेळा
आजा भरवायचा चवदार 'गोपाळकाला'
मऊमऊ भातावर निरशा दुधाची धार
खाऊन पोरं व्हायची गपगार
मुखशुध्दीला गूळ आन् शेंगा
पोरांचा चालायचा अंगणातच दंगा
आताच्या आजोबांच्या फ्लॅटमध्ये
किचन, बेडरूम, आन् हॉल
मात्र आजोबांचेच पुरते हाल
आजी असते टी.व्ही पुढे
गॅसवर त्यांच्या कुकर चढे
कुकरात असतो फक्त वरणभात
तोच वाढते आज्जी टी.व्ही पहात
मम्मी बनवते 'मॅगी' एकच मिनिटात
पिझ्झा, बर्गर खायला, पप्पा नेतात हॉटेलात

हस्ताक्षर: नलीनी खपरे

— सौ. कादंबरी गजानन देशमुख,
सातारा, फोन - ९५०५५४२४५५

